**ठळक बातम्या**

- केरळमधल्या वायनाड दुर्घटनेतल्या बचावकार्यात आतापर्यंत ३० जणांना वाचवण्यात यश, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून आपतग्रस्त भागाचं हवाई सर्वेक्षण

- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत अर्ज केलेल्या सर्वांना तारखेला ओवाळणी म्हणून दोन महिन्याचं अनुदान जमा करण्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

- नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची मंजुरी

- कर विषयक कायदे, आर्थिक जबाबदारी जनसामान्यांना साक्षर करण्यासाठी सनदी लेखापालांनी पुढाकार घेण्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं आवाहन

**आणि**

- ज्येष्ठ मराठी अभिनेते विजय कदम यांचं दीर्घ आजारानं निधन

**<><><><><>**

केरळमध्ये वायनाड इथं ३० जुलै रोजी दरड कोसळून झालेल्या दुर्घटनाग्रस्त प्रदेशाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज भेट दिली. त्यांनी आपतग्रस्त प्रदेशाचं हवाई सर्वेक्षण केलं. तसंच बचाव आणि मदतकार्याची माहिती घेतली. केरळचे मुख्यमंत्री पिनरायी विजयन यावेळी प्रधानमंत्र्यांसोबत होते. यावेळी प्रधानमंत्र्यांनी मदत शिबिरं तसंच रुग्णालयांनाही भेट दिली. दुर्घटनेत जखमी झालेल्यां आणि मृतांच्या कुटुंबीयांशी त्यांनी संवाद साधला. या दुर्घटनेला राष्ट्रीय आपत्ती घोषित करावं अशी मागणी राज्य सरकार आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालच्या विरोधी पक्षांनी केली आहे.

दरम्यान, वायनाडमध्ये केंद्र सरकारने राबवलेल्या बचाव कार्यात आतापर्यंत ३० जणांना वाचवण्यात यश आलं आहे, तर ५२० जणांना सुरक्षित स्थळी हवलण्यात आलं. घटनास्थळावरून ११२ मृतदेह ताब्यात घेण्यात आले आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्लीत अत्यंत सुपीक, हवामानाला अनुकूल आणि जैव संवर्धन करणाऱ्या पिकांच्या १०९ वाणांच्या वाटपाचा प्रारंभ करणार आहेत. यावेळी ते शेतकरी आणि वैज्ञानिकांशी संवाद साधतील. यात ६१ पिकांचा समावेश असून ३४ शेतातील पिकं आणि २७ बागायती पिकं आहेत. बाजरी, चारा पिकं, तेलबिया, कडधान्य, ऊस, कपाशी, तृणधान्य आणि इतर पिकांचा शेतातल्या पिकांत समावेश असून बागायती पिकांमध्ये फळं, भाज्या, लागवडीची पिकं, कंदमुळं, मसाले, फुलं आणि औषधी रोपट्यांचा समावेश असेल.

**<><><><><>**

सरकार बँकिंग क्षेत्रात बहुप्रतिक्षित सुधारणा राबवत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज रिझर्व्ह बँकेच्या मध्यवर्ती संचालक मंडळाच्या बैठकीला उपस्थित राहिल्यानंतर आयोजित वार्ताहर परिषदेत बोलत होत्या. बँकिंग नियमन सुधारणांची दीर्घ काळापासून गरज होती असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातला संपर्क वाढवण्याच्या उद्देशाने सुरू झालेल्या अजिंठा लेणी रेल्वे जोडणी प्रकल्पाची माहिती आज रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. नवी दिल्ली इथं आयोजित वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. प्रादेशिक औद्योगिक विकासाला चालना देणारा हा प्रकल्प असून यात जालना ते जळगाव असा १७४ किलोमीटर लांबीचां रेल्वेमार्ग विकसित केला जाईल. या मार्गामुळे दोन्ही जिल्ह्यातलं प्रवासाचं अंतर ५० टक्क्याने कमी होईल. या प्रकल्पात

२३ पूर्णांक ५ दशांश किलोमीटर लांबीचा बोगदाही असेल. या प्रकल्पासाठी ९३५ हेक्टर जमीन संपादित केली जाणार असून पुढच्या चार ते पाच वर्षांत हा प्रकल्प पूर्ण होणं अपेक्षित आहे, अशी माहिती अश्विनी वैष्णव यांनी दिली.

**<><><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत अर्ज केलेल्या सर्व बहिणींना येत्या १७ तारखेला ओवाळणी म्हणून दोन महिन्यांचं अनुदान खात्यात जमा करण्यात येईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. या योजनेत जवळपास दीड कोटी माहिलांनी अर्ज भरले आहेत, अजूनही अर्ज भरले जात आहेत. पुढच्या महिन्यात अर्ज करणाऱ्या महिलांना तीन महिन्यांचे पैसे मिळतील. एकही पात्र बहीण वंचित राहणार नाही, अशी ग्वाही शिंदे यांनी दिली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा प्रचार, प्रसार , साक्री उपजिल्हा रुग्णालयासह अन्य विकास कामांचं भूमीपूजन आणि उदघाटन मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते आभासी पद्धतीने करण्यात आलं. **धुळे** जिल्ह्यातील भाडणे इथं हा कार्यक्रम झाला. त्यावेळी ते बोलत होते. लाकडी बहीण योजना बहिणींचा अधिकार आहे, तो त्यांना मिळणारच. योजनेत कोणी वंचित राहणार नाही याची काळजी घावी असे ते जिल्हाधिकाऱ्यांना उद्देशून म्हणाले.

**<><><><><>**

भारतातल्या सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग निर्यातीत रत्ने आणि दागिने निर्यातीचा मोठा वाटा असून हिरे उत्तेजना परवाना सुरु केल्यामुळे या उद्योगांना लाभ मिळणार असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी सांगितलं आहे. ते आज मुंबईत भारत आंतरराष्ट्रीय दागिने प्रदर्शनाच्या उद्घाटन समारंभात बोलत होते. निर्यातीला चालना मिळण्यासाठी आपलं मंत्रालय मुक्त व्यापार करारांवर स्वाक्षऱ्या करण्याची प्रक्रिया वेगाने पार पाडत असल्याची माहिती त्यांनी दिली.

याबाबत, युरोपीय संघ आणि इंग्लंड सोबत चर्चा पुढच्या टप्प्यात पोहोचल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

प्रसार भारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सेहगल यांनी दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यादरम्यान आज आकाशवाणी मुंबई केंद्राला भेट दिली आणि सर्व विभागांच्या कामाचा आढावा घेतला. श्रोत्यांना आवडण्याजोग्या कार्यक्रमांवर लक्ष केंद्रित करण्याची सूचना त्यांनी आकाशवाणीच्या अधिकाऱ्यांना बैठकीदरम्यान केली. युवा आणि महिला केंद्रित कार्यक्रमांवर अधिक भर ध्यावा, आर्थिक आत्मनिर्भरतेच्या दृष्टीने अधिकाधिक कार्यक्रम जाहिरातदारांपर्यंत घेऊन जावेत, असा सल्लाही त्यांनी दिला. वृत्तविभागाच्या प्रमुख सरस्वती कुवळेकर, कार्यक्रम प्रमुख नारायण पवार, कार्यालय प्रमुख श्रीकृष्ण क्षीरसागर यांच्यासह आकाशवाणी आणि दूरदर्शनचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

महत्वाकांक्षी वैनगंगा - नळगंगा नदीजोड प्रकल्पानंतर नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाला महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मंजुरी दिली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात ही माहिती दिली. या योजनेतून पश्चिमी वाहिनी नार-पार-गिरणा या नदीखोऱ्यातून १० पूर्णांक ६४ शतांश टीएमसी पाणी वापर प्रस्तावित असून त्याचा लाभ नाशिक आणि जळगाव जिल्ह्यातल्या ४९ हजार ५१६ हेक्टर क्षेत्राला होणार आहे. ७ हजार १५ कोटी रुपयांचा हा प्रकल्प असून राज्याच्या जलसमृद्धीच्या दृष्टिने हे आणखी एक ऐतिहासिक पाऊल ठरेल, असं फडणवीस त्यांच्या संदेशात म्हणाले.

<><><><><>

कर विषयक कायदे, आर्थिक जबाबदारी याविषयी जनसामान्यांना साक्षर करुन आर्थिक विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी सनदी लेखापालांनी पुढाकार घ्यावा, असं आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केलं.

'द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंट्स ऑफ इंडियाच्या नागपूर शाखेच्या वतीनं आयोजित दोन दिवसीय विदर्भ परिषदेचं उद्घाटन उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते. नव्या करप्रणालीच्या प्रभावी अंमलबजावणीतून महाराष्ट्राची आर्थिक घोडदौड सुरु आहे. वर्ष २०२८-२९ पर्यंत ५०० ट्रिलियनची अर्थव्यवस्था बनविण्याच्या दृष्टीनं योजनाबद्धरित्या कार्य सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाज माध्यमावरही तिरंग्याचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत. घरोघरी तिरंगा अभियानाविषयी अभिनेता समीर चौघुले यांनी आकाशवाणीला सांगितलं…

**होल्ड -- बाईट - (समीर चौघुले)**

**<><><><><>**

ज्येष्ठ मराठी अभिनेते विजय कदम यांचं आज दीर्घ आजारानं निधन झालं. ते ६७ वर्षांचे होते. काही काळापूर्वी त्यांना कर्करोगाचं निदान झालं होतं. मराठी नाटक, चित्रपट आणि मालिकांमध्ये त्यांनी विविध भूमिका केल्या. १९८० आणि ९०च्या दशकात त्यांनी रंगभूमीवर केलेल्या विनोदी भूमिका प्रचंड गाजल्या. प्रायोगिक रंगभूमीवरुन कारकिर्दीची सुरुवात करणाऱ्या कदम यांनी टुरटूर या नाटकाद्वारे व्यावसायिक रंगमंचावर पदार्पण केलं. त्यानंतर विच्छा माझी पुरी करा, हे त्यांचं वगनाट्यही रसिकांनी उचलून धरलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री

देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी विजय कदम यांना समाज माध्यमावरच्या संदेशातून आदरांजली वाहिली आहे. एक अष्टपैलू अभिनेता हरपल्याचं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्य सरकारने सुरु केलेली लाडकी बहीण योजना फसवी असून मतदारांच्या मतांवर डोळा ठेवून ती सुरु करण्यात आल्याचा आरोप काँग्रेसनं केला आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी तर विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडेल असा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

**//<><><><><>//**